## प्रेसनोट दि. ०५.०८.२०२२

**लोकसेवक शाबान रमजान मुलाणी वय ४४ वर्षे, कोतवाल सांगलीवाडी तलाठी कार्यालय रा. घर नं १५१, हनुमान मंदीर चौक, सांगलीवाडी ता. मिरज, जि. सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे मा कोर्टाने दिलेल्या सरस निरस वाटणी पत्रकाची नोंद घेवुन सात बारा उतारा देणे करीता ८०००/- रुपये लाच मागणी करुन ६०००/- रुपये लाच स्विकारलेने त्यांचे विरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सांगलीची कारवाई.**

---

तक्रारदार यांचे आईने खरेदी केलेल्या प्लॉटचे सरस निरस वाटणी पत्रकाची तक्रारदार यांचे बाजुने लागलेल्या कोर्टाचे निकाला प्रमाणे सात बारा उताऱ्यावर नोंद घेवुन तक्रारदार यांना नावाचा सात बारा उतारा देणे करीता गावचावडी कार्यालय सांगलीवाडी येथील तलाठी लोकसेवीका दाभाडे व कोतवाल शाबान मुलाणी यांनी ८,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.२०.०६.२०२२ रोजी दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि.२०.०६.२०२२, दि.२१.०६.२०२२, दि.२२.०६.२०२२, दि.२३.०६.२०२२, दि.२४.०६.२०२२, दि.३०.०६.२०२२, दि.२८.०७.२०२२ व दि.०४.०८.२०२२ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये तक्रारदार यांचे बाजुने लागलेल्या कोर्टाचे निकाला प्रमाणे वाटणी पत्रकाची वरीष्ठांना सांगुन सात बारा उताऱ्यावर नोंद घेवुन सात बारा उतारा देणे करीता कोतवाल शाबान रमजान मुलाणी याने वरीष्ठांचे करीता तक्रारदार यांचेकडे ८,०००/- रूपये लाचेची मागणी करून ताडजोडीअंती ६०००/- रूपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम घेवुन येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि.०५.०८.२०२२ रोजी गाव चावडी कार्यालय सांगलीवाडी या ठिकाणी सापळा लावला असता शाबान रमजान मुलाणी वय ४४ वर्षे, कोतवाल सांगलीवाडी तलाठी कार्यालय रा. घर नं १५१, हनुमान मंदीर चौक, सांगलीवाडी ता. मिरज, जि. सांगली यांनी तक्रारदार यांचकडे लाचेची मागणी करून तक्रारदार यांचेकडून ६,०००/- रूपये स्विकारलेनंतर त्यांना पकडण्यात आले आहे. लोकसेवक शाबान रमजान मुलाणी वय ४४ वर्षे, कोतवाल सांगलीवाडी तलाठी कार्यालय रा. घर नं १५१, हनुमान मंदीर चौक, सांगलीवाडी ता. मिरज, जि. सांगली यांचे विरुध्द सांगली शहर पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री. सुरज गुरव, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली यांचे मार्गदर्शनाखाली श्री. दत्तात्रय पुजारी, पोलीस निरीक्षक, श्री विनायक भिलारे, पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार संजय संकपाळ, धनंजय खाडे, प्रितम चौगुले, राधीका माने, सलीम मकानदार, रविंद्र धुमाळ, भास्कर भोरे चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सत्यमेव जयते

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with OKEN Scanner